# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 03/09/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 25/10/2020 चे 13.30 वा. पासुन 31/08/2021 चे 18.00 वा. दरम्यान 19 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि झुम्बा क्लासेस मध्ये आरोपी नामे– 1) शुभम दौलत नारेकर, वय 27 वर्ष, रा. होळी चौक, सावनेर याच्या कडे जात होती. सदर आरोपीने दि. 25/10/2020 चे 13.30 वा. सुमारास फिर्यादीला त्याचे घरी बोलावून बेडरूम मध्ये नेवून जबरदस्तीने तिच्याशी तिन वेळा शारीरिक संबध केले व सदरची घटने बाबत कोणलाही न सांगन्याची धमकी दिली. तसेच सदरची घटना यातील आरोपी क्र. 2) निखील निळकंठराव भगत, वय 36 वर्ष रा. वार्ड क्र. 10 होळी चौक, सावनेर याला माहिती झाल्याने त्यांनीही फिर्यादीला वारंवार फोन करून धमकी देवून तिला दि. 02/08/2021 रोजी खापा रोड जवळ एका ठिकाणी नेवुन तिचा विनयभंग केला. तसेच आरोपी 2) निखील भगत याने पुन्हा दि. 21/08/2021 रोजी त्याच ठिकाणी नेवुन फिर्यादीशी जबरदस्ती शारीरिक संबंध केले. त्यावर 31/08/2021 रोजी फिर्यादीच्या आईला सदर बाब माहिती झाल्यावर आरोपी निखील भगत याने तिला शिविगाळ करून धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 376,376(2)(एन) 354,354 (ड) 504,507,34 भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर 9082196080 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर